कल्याण - ३
दस्त क्र. ७२३४० / २०२१
९० | १०

वॉर्ड क्र. : २५/७७

मौजे : टिटवाळा

मिळकतीचे क्षेत्र : एकूण क्षेत्र २१९७ चौरस मीटर्स क्षेत्राचे विकसीत हक्क विकसीत कराराने तबदील करण्यासाठीचा भूविकास करार.

बाजार मुल्य : रुपये ३,५७,७२,०००/-

खरेदी मुल्य : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या संबंधीत नगररचना विभागाकडून मंजूर होणाऱ्या एकूण बांधकाम क्षेत्रापैकी ९०० चौरस मीटर्स (कारपेट) रहिवासी बांधकाम क्षेत्र तसेच ४ स्टिल्ट पार्कींगसह वास्तुस्वरुपी मोबदल्यापोटी तसेच ना परतावा रक्कम रूपये ७५,००,०००/- आर्थिक मोबदल्यापोटी.

मुद्रांक शुल्क : रुपये १७,८८,६००/-

॥ श्री ॥

भूविकास करार

जमिनींच्या मिळकती सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत अशी विकत तसेच विकसीत करण्याकरीता देण्याचा भूविकास करार

आज दिनांक ०२ माहे ~~सप्टेंबर~~ नोव्हेंबर, २०२१ रोजी लिहून दिला असे.

मे. साई गणेश एंटरप्रायझेस, भागीदारी संस्था, ) भूविकास करार
भागीदारी संस्थेचे कार्यालय : ए/९, बाळकृष्ण अपार्टमेंट, ) लिहून घेणार
घनश्याम गुप्ते रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१ २०२ ) विकासक
जिल्हा ठाणे. (पॅन नं. **ACGFS5266E**) )
भागीदारी संस्थेतर्फे भागीदार )
१) श्री. मिलींद जगन्नाथ वाळेकर, (पॅन नं.AAHPW7340Q) )
वय ५६ वर्षे, व्यवसाय : व्यापार, )
२) श्री. भावेश जयंतीलाल पटेल, (पॅन नं.ALZPP3138Q) )
वय ३८ वर्षे, व्यवसाय : व्यापार, )
३) श्री. सुरेश शांताराम म्हात्रे, (पॅन नं. ABNPM6784H) )
वय ५६ वर्षे, व्यवसाय : व्यापार, ) प्रथम पक्षीय

(सदर भूविकास करारात यापुढे त्यांना प्रथम पक्षीय/लिहून घेणार/विकासक असा उल्लेख केला असून, त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे.)

यांस...

कलन – ३

दस्त क्र. ९७३४० २०२१

९९ ८०



१) श्री. योगेश मार्तंड जोशी, (पॅन नं. AATPJ3011H) ) भूविकास करार
वय ५४ वर्षे, व्यवसाय : नोकरी ) लिहून देणार
२) श्री. हेरंब मार्तंड जोशी, (पॅन नं. AATPJ3010G) ) जमीन मालक
(आधारकार्ड क्र. ८२५५ २२९१ १५९५) )
वय ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी )
दोघेही रा. जोशी वाडा, गणपती मंदीराजवळ, )
टिटवाळा (पुर्व) – ४२१ ६०५,तालुका कल्याण, जिल्हा ठाणे) द्वितीय पक्षीय

(सदर भूविकास करारात यापुढे यांचा द्वितीय पक्षीय/लिहून देणार/जमीन मालक असा उल्लेख केला असून, त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे.)

आणि...

१) सौ. श्वेता योगेश जोशी, (पॅन नं. ALVPJ7138E) ) भुविकास करारास
वय ४९ वर्षे, व्यवसाय : गृहीणी, ) मान्यता देणार
२) कु. ईशान योगेश जोशी, (पॅन नं. APMPJ7215F) )
वय २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी, )
३) कु. ईश्वरी योगेश जोशी, (पॅन नं. AQDPJ7017M) )
वय २१ वर्षे, व्यवसाय : शिक्षण, )
४) सौ. स्वाती हेरंब जोशी, (पॅन नं. AKGPJ0348E) )
(आधारकार्ड क्र. ८७२७ ७४१९ ४६७४) )
वय ४४ वर्षे, व्यवसाय : गृहीणी, )
स्वत:करीता व कु. मनस्वी हेरंब जोशी, वय १२ वर्षे )
हिची अज्ञानपालनकर्ती जनकमाता म्हणून, )
५) कु. मुक्ता हेरंब जोशी, )
(आधारकार्ड क्र. २६२७ ५२२९ ७५०५) )
वय १८ वर्षे, व्यवसाय : शिक्षण, )
अनु क्र. १ ते ५ सर्व रा. जोशी वाडा, गणपती मंदीराजवळ, )
टिटवाळा (पुर्व)– ४२१६०५, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे.) तृतीय पक्षीय

(सदर भुविकास करारात यापुढे यांचा तृतीय पक्षीय/मान्यता देणार असा उल्लेख केला असून, त्यात त्यांचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक वगैरेंचा समावेश आहे)

कल्याण — ३
दस्त क्र. ९२३४० | २०२२
१२ | ८०

कारणे उभयपक्षीय भूविकास करार लिहून देतात व घेतात, तो येणे प्रमाणे :—

तुकडी जिल्हा ठाणे, पोटतुकडी तालुका कल्याण, मौजे टिटवाळा येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील जमीनींच्या मिळकती तसेच मे. दुय्यम निबंधक साहेब, कल्याण यांच्या अधिकार क्षेत्रातील खालील परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या जमीनींच्या मिळकती :

"परिशिष्ट"

| अनु क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (चौरस मीटर्स) |
|---|---|---|---|
| १. | १९० | ९/अ | १३७ चौरस मीटर्स |
| २. | १९० | ९/ब | ४६० चौरस मीटर्स |
| ३. | १९० | १० | १३१० चौरस मीटर्स |
| ४. | १९० | १०/ब | २९० चौरस मीटर्स |
| एकुण क्षेत्र | | | २१९७ चौरस मीटर्स |

अशा वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु. क्र. १ ते अनु. क्र. ४ या जमीनींच्या मिळकती लिहून देणार यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या असून, सरकार दप्तरी ७/१२ सदरी लिहून देणार यांच्या संयुक्त नावे नोंद असून, अशा सदरहू जमीनींच्या मिळकतीत लिहून देणार यांना संयुक्त मालकी हिस्सा, हक्क, अधिकार व हितसंबंध प्राप्त झाले असून, अशा अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतींस एकत्रितपणे म्हणजेच एकुण २१९७ चौरस मीटर्स क्षेत्राच्या जमीनीच्या मिळकतीस यापुढे सदरहू भूविकास करारात "सदरहू मिळकती" म्हणून संबोधण्यात आले आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु. क्र. १ ते अनु. क्र. ४ या जमीनींच्या मिळकती लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार मार्तंड गजानन जोशी यांच्या मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या होत्या.

सदरहू मिळकती श्री. रामचंद्र त्रिंबक जोशी यांनी दिनांक १६/०४/१९४२ रोजी दिलेल्या कबुली जबाबान्वये सदरहू मिळकतीची वाटणी करून १) श्री गोविंद गजानन जोशी यांची अज्ञान पालनकर्ती अन्नपुर्णाबाई २) त्रिंबक नारायण जोशी अज्ञान पालनकर्ती लक्ष्मीबाई यांच्या वाटयास आलेली असून, सदरची नोंद सरकार ७/१२ सदरी दिनांक ०१/०८/१९४२ रोजीच्या फेरफार क्र. २१७ अन्वये दिनांक ०१/०८/१९४२ रोजी नोंद करण्यात आलेली आहे.

कलम – ३
दस्त क्र. ९७३१० / २०२१
९३ / ६०



सदरहू मिळकती संदर्भात श्री. गोंविद गजानन जोशी यांनी दिलेल्या कबुली जबाबावरुन १) श्री. सदाशिव गजानन जोशी २) श्री. मार्तंड गजानन जोशी व ३) अन्नपुर्णाबाई गजानन जोशी – आई यांना त्यांच्या हिस्से राशी प्रमाणे त्यांच्या हिश्यात देण्यात आलेली आहे. सदरची नोंद सरकार ७/१२ सदरी फेरफार क्र. ३२७ अन्वये दिनांक ०१/१०/१९५५ रोजी नोंद करण्यात आलेली आहे.

दरम्यानच्या कालावधीत वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स व अनु क्र. ३ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकती दिनांक ०२/०५/१९८९ रोजीचे कायम फरोक्तखतान्वये श्री. मार्तंड गजानन जोशी व इतर २ यांच्याकडून श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल यांनी स्वत: करीता व एकत्र कुटुंबाचे पुढारी या नात्याने विकत घेतलेल्या असून, सदरचे कायम फरोक्तखत मे. दुय्यम निबंधक, कल्याण यांचे कार्यालयात दिनांक ०२/०५/१९८९ रोजी अनु. क्र. ३३८०/१९८९ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. २ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९ब (जुना सर्व्हे नं. १९०/९(पैकी)) क्षेत्र ४६० चौरस मीटर्स व अनु क्र. ४ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१०/ब (जुना सर्व्हे नं. १९०/१०(पैकी)) क्षेत्र २९० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकती दिनांक ०२/०५/१९८९ रोजीच्या खरेदीखताने श्री. मार्तंड गजानन जोशी व इतर २ यांच्याकडून श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल व कै. भगवतीदेवी मनोहरलाल अग्रवाल यांनी विकत घेतल्या असून, सदरचे खरेदीखत मे. दुय्यम निबंधक, कल्याण यांचे कार्यालयात अनु. क्र. ३३८१/१९८९ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे.

सदरहू मिळकतींपैकी म्हणजेच वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु क्र. २ ची सर्व्हे नं. १९०/९ब (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र ४६० चौरस मीटर्स व अनु क्र. ४ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१०/ब (जुना सर्व्हे नं. १९०/१०(पैकी)) क्षेत्र २९० चौरस मीटर्स या मिळकती श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल हे स्वत: करीता व एकत्र कुटुंबाचे पुढारी म्हणून व श्रीमती भगवतीदेवी मनोहरलाल अग्रवाल यांनी लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार श्री. मार्तंड गजानन जोशी हे स्वत: करीता व अज्ञान मुलगा हेरंब मार्तंड जोशी यांचे अज्ञान पालनकर्ता म्हणून व एकत्र हिंदु कुटुंबाचे पुढारी म्हणून यांचेकडून वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु क्र. २ ची सर्व्हे नं. १९०/९ब (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र ४६० चौरस मीटर्स व अनु क्र. ४ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१०/ब (जुना सर्व्हे नं.

कलम - ३
दस्त क्र.९२३४० २०२१
९४ ६०

१९०/१०(पैकी)) क्षेत्र २९० चौरस मीटर्स या मिळकती दिनांक १४/०८/१९८९ रोजीच्या कायम खरेदीखताने विकत घेतल्या असून, सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी दिनांक ०४/०९/१९८९ रोजीच्या फेरफार क्र. १३७६ अन्वये करण्यात आली आहे.

दरम्यानच्या कालावधीत सदरहू मिळकतींपैकी म्हणजेच वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु क्र. १ ची सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स तसेच अनु. क्र. ३ ची सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या मिळकती व अन्य मिळकती नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ चे कलम १० (१) प्रमाणे मा. उपजिल्हाधिकारी व सक्षम अधिकारी उल्हासनगर नागरी संकुलन ठाणे यांचेकडील नोटीफिकेशन नं. १४७ अन्वये दिनांक १५/०१/१९९४ रोजी व नोटीफिकेशन नं. १६२ अन्वये दिनांक १५/०१/१९९४ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र फेब्रुवारी २३, १९९५/फाल्गुन ४, शके १९१६ पान नं. ११० व ११८ अन्वये अतिरीक्त म्हणून घोषित झालेल्या आहेत. सदरची नोंद फेरफार क्रं. १५५४ अन्वये दिनांक ०१/०९/१९९५ रोजी करण्यात आलेली आहे.

सदरहू मिळकतींबाबत मा. उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हासनगर नागरी संकुलन ठाणे यांचेकडील नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ चे कलम १०, पोट कलम (५) अन्वये दाखल केलेल्या म्हणजेच वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु क्र. १ ची सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स तसेच अनु. क्र. ३ ची सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या सर्व्हे नंबरची जमीन महाराष्ट्र शासनाच्या नांवे दाखल करण्यात आली असून, सदरची नोंद फेरफार क्रं. १९२९ अन्वये दिनांक १५/०२/२००८ रोजी करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या अनु क्र. १ ची सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स तसेच अनु. क्र. ३ ची सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या मिळकती व अन्य मिळकती जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ चे अंतर्गत कलम १० (३) व १०(५) अन्वये कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन म्हणून नोंद झाली असून, सदरच्या नोंदीबाबत मा. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हासनगर नागरी संकुलन ठाणे यांचे कडील आदेश क्र. यु.एल.सी./यु.एल.एन./६(१) एस.आर. – १०४/टिटवाळा दिनांक ०९/०९/२०१० चे आदेशावरून कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन म्हणून नोंद कमी करून, लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार श्री. मार्तंड

कलन — ३
दस्त क्र.९२३४० | २०२१
९५ | ६०



गजानन जोशी यांचे नांव कब्जेदार सदरी दाखल केले आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २१०२ अन्वये दिनांक १०/०९/२०१० रोजी करण्यात आलेली आहे.

सदरहू मिळकतीचे वारसाने खातेदार श्रीमती भगवतीदेवी मनोहरलाल अग्रवाल हया दिनांक २७/०५/२००१ रोजी मयत झाल्या असून, त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून

१) सौ. शकुंतलादेवी श्यामलाल गुप्ता — मुलगी

२) श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल — मुलगा

३) सौ. प्रभावती वेदप्रकाश गुप्ता — मुलगी

४) सौ. सरला संतोषकुमार अग्रवाल — मुलगी

असे वारस आहेत. त्यांच्या वारसांच्या नावाची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २१०६ अन्वये दिनांक २२/०९/२०१० रोजी नोंद करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. २ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९ब (जुना सर्व्हे नं. १९०/९(पैकी)) क्षेत्र ४६० चौरस मीटर्स व अनु क्र. ४ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१०/ब (जुना सर्व्हे नं. १९०/१०(पैकी)) क्षेत्र २९० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकती संदर्भात १) श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल हे स्वतः करीता व अनु क्र. २ ते ३ यांचे कुलमुखत्यारी म्हणून २) सौ. शकुंतलादेवी श्यामलाल गुप्ता ३) सौ. प्रभावती वेदप्रकाश गुप्ता ४) सौ. सरला संतोषकुमार अग्रवाल यांचेकडून १) श्री. मार्तंड गजानन जोशी २) श्री. योगेश मार्तंड जोशी ३) श्री. हेरंब मार्तंड जोशी यांनी दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या कायम फरोक्तखतान्वये विकत घेतली असून, सदरचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे फरोक्तखत मे. दुय्यम निबंधक कल्याण–२ यांच्या कार्यालयात अनु क्र. ७६५१/२०१२ अन्वये दिनांक ०४/०९/२०१२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेले असून, सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २३६१ अन्वये दिनांक ०४/१०/२०१२ रोजी करण्यात आलेली आहे.

कल्याण – ३
दस्त क्र. ९२३४० | २०२१
९८ | ६०

सदरहू वर नमुद दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या फरोक्तखताच्या अनुषंगाने दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे कुलमुखत्यारपत्र देखील मे. दुय्यम निबंधक कल्याण–२ यांच्या कार्यालयात अनु क्र. ७६५४/२०१२ अन्वये दिनांक ०४/०९/२०१२ रोजी लिहून व नोंदवुन दिलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स व अनु क्र. ३ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकती संदर्भात दिनांक ०२/०५/१९८९ रोजीचे कायम खरेदीखत मे. दुय्यम निबंधक कल्याण यांच्या कार्यालयात अनु क्र. ३३८०/१९८९ अन्वये लिहून व नोंदवुन दिलेले कायम खरेदीखत श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल यांनी स्वतःकरीता एकत्र कुटुंबाचे पुढारी म्हणून १) श्री. मार्तंड गजानन जोशी २) श्री. योगेश मार्तंड जोशी ३) श्री. हेरंब मार्तंड जोशी यांच्या लाभांत मे. दुय्यम निबंधक कल्याण–२ यांच्या कार्यालयात अनु क्र. ७६५२/२०१२ अन्वये दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या रद्दबातल दस्तान्वये लिहून व नोंदवुन दिलेले असून, सदरच्या दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या रद्दबातल दस्तान्वये दिनांक ०२/०५/१९८९ रोजीचे कायम खरेदीखत रद्द करण्यात आलेले आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ ची सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स तसेच अनु. क्र. ३ ची सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकतीबाबत श्री. कालीचरण मनोहरलाल अग्रवाल यांनी स्वतःकरीता एकत्र कुटुंबाचे पुढारी म्हणून यांनी १) श्री. मार्तंड गजानन जोशी २) श्री. योगेश मार्तंड जोशी ३) श्री. हेरंब मार्तंड जोशी यांच्या लाभांत दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या घोषणापत्र/डिक्लरेशन/हमीपत्र लिहून दिलेले असून, दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या रद्दबातल दस्तान्वये लिहून देणार हे पुर्णपुणे मालक झाले असून, सदरचे घोषणापत्र/डिक्लरेशन/हमीपत्र मे. दुय्यम निबंधक कल्याण–२ यांच्या कार्यालयात अनु क्र. ७६५३/२०१२ अन्वये दिनांक ०४/०९/२०१२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार मार्तंड गजानन जोशी हे दिनांक २९/१०/२०१६ रोजी मयत झाले असून, त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून

१) श्री. योगेश मार्तंड जोशी — मुलगा

SYJoshi Bhaven

कलन – ३
दस्त क्र. ०७३४० | २०२१
९५ | ६०



२) श्री. हेरंब मार्तंड जोशी — मुलगा

असे वारस आहेत.

दरम्यानच्या कालावधीत लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार मार्तंड गजानन जोशी यांनी त्यांच्या हयातीत सदरहू मिळकती संदर्भात दिनांक ३०/१०/२०१२ रोजीचे नोंदणीकृत मृत्युपत्र लिहून ठेवले असून, कै. मार्तंड गजानन जोशी यांनी

१) श्री. योगेश मार्तंड जोशी — मुलगा

२) श्री. हेरंब मार्तंड जोशी — मुलगा

यांच्या लाभांत वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ ची सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९ पैकी) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स तसेच अनु. क्र. ३ ची सर्व्हे नं. १९०/१० (जुना सर्व्हे नं. १९०/१०) क्षेत्र १३१० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकतींची विभागणी करून, वाटप केलेले आहे. सदरचे मृत्युपत्र/ इच्छापत्र मे. दुय्यम निबंधक कल्याण–१ यांच्या कार्यालयात अनु. क्र. ८०२३/२०१२ अन्वये दिनांक ३०/१०/२०१२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेले आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २९०४ अन्वये दिनांक १८/०२/२०२० रोजी करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकती संदर्भात मा. तहसिलदार कल्याण यांचेकडील आदेश क्र. कलम १५५/क्षेत्र दुरूस्ती/ १५५/ दुरूस्ती मान्यता/ ३४२/२०२० दिनांक २२/१२/२०२० रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार नवीन ७/१२ संगणीकृत करणेकामीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २९६३ अन्वये दिनांक २२/१२/२०२० रोजी करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. २ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९ब (जुना सर्व्हे नं. १९०/९) क्षेत्र ४६० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकतीबाबत मा. तहसिलदार कल्याण यांचेकडील आदेश क्र. कलम १५५/क्षेत्र दुरूस्ती/१५५/ दुरूस्ती मान्यता/३४३/२०२० दिनांक २२/१२/२०२० रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार नवीन ७/१२ संगणीकृत करणेकामीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी

कलन - ३
दस्त क्र. ९२३४० २०२२
९८ ६०

७/१२ सदरी फेरफार क्र. २९६४ अन्वये दिनांक २२/१२/२०२० रोजी करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. १ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/९अ (जुना सर्व्हे नं. १९०/९) क्षेत्र १३७ चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकतीबाबत मा. तहसिलदार कल्याण यांचेकडील आदेश क्र. कलम १५५/क्षेत्र दुरूस्ती/१५५/दुरूस्ती /मान्यता/ ३६७/२०२१ दिनांक ०२/०३/२०२१ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार नवीन ७/१२ संगणीकृत करणेकामीचा आदेश पारीत केला आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २९९३ अन्वये दिनांक ०२/०३/२०२१ रोजी करण्यात आलेली आहे.

वर परिशिष्टात खुलासेवार नमुद केलेल्या अनु क्र. ४ म्हणजेच सर्व्हे नं. १९०/१०ब (जुना सर्व्हे नं. १९०/१०(पैकी)) क्षेत्र २९० चौरस मीटर्स या जमीनींच्या मिळकतीबाबत मा. तहसिलदार कल्याण यांचेकडील आदेश क्र. कलम १५५/क्षेत्र दुरूस्ती/ १५५/ दुरूस्ती /मान्यता/ ३६८/२०२१ दिनांक ०२/०३/२०२१ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार नवीन ७/१२ संगणीकृत करणेकामीचा आदेश पारीत केला आहे. सदरची नोंद सरकार दप्तरी ७/१२ सदरी फेरफार क्र. २९९४ अन्वये दिनांक ०२/०३/२०२१ रोजी करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतींचे म्हणजेच लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार मार्तंड गजानन जोशी यांचे कायदेशीर वारस या नात्याने लिहून देणार यांना सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतींत सामाईक मालकी हक्क व हितसंबंध प्राप्त झाले आहेत. **अशा प्रकारे लिहून देणार यांच्या सामाईक हिश्याच्या जमीनींच्या मिळकती म्हणजेच २१९७ चौरस मीटर्स क्षेत्राच्या जमीनींच्या मिळकती लिहून घेणार यांना विकासक या नात्याने विकासकार्य राबविण्याकामी विकसित करारान्वये देण्याचे लिहून देणार यांनी मान्य व कबुल केले आहे.**

वर परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेल्या सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतींत लिहून देणार यांना सामाईक मालकी हक्क, अधिकार व हितसंबंध प्राप्त झाले असून, सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकती हया लिहून देणार यांच्या वडीलोपार्जित मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या

कलन - ३
दस्त क्र. ०७३४० २०२१
९८ ६०



असल्याने, सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतींचा आजमितीस लिहून देणार हे उपभोग घेत आहेत.

सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकती संदर्भात लिहून देणार यांना लिहून देणार यांचे पुर्वगामी हक्कदार मार्तंड गजानन जोशी यांचे कायदेशीर वारस या नात्याने सदरहू मिळकती विक्री करण्याचे अथवा सदरहू अनु क्र. १ ते अनु क्र. ४ या जमीनींच्या मिळकतीचे विकसीत हक्क भावी विकासकास तबदील करण्याचे व त्या अनुषंगाने मिळकतीचे विकसीत हक्क तबदील करण्यापोटी वास्तुस्वरूपी मोबदला तसेच आर्थिक मोबदला स्विकारण्याचे हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत.

सदरहू मिळकती संदर्भात लिहून घेणार यांना विकासक या नात्याने भविष्यात कोणतीही अडचण उपस्थित होऊ नये तसेच सदरहू मिळकती लिहून घेणार/विकासक यांना सर्वऋणबोझेमुक्त व बोजेविरहीत अशा प्राप्त व्हाव्यात म्हणून मान्यता देणार अनु. क्र. १ ते ३ हे लिहून देणार अनु. क्र. १ यांच्या कुटुंबातील घटक या नात्याने तसेच मान्यता देणार अनु. क्र. ४ व ५ हे लिहून देणार अनु. क्र. २ यांच्या कुटुंबातील घटक या नात्याने सदरहू भुविकास करारात सामिल झालेले आहेत.

उभयपक्षांत सदरहू भुमिविकास करार करण्यात येत असून, मान्यता देणार हे लिहून देणार यांच्या कुटुंबातील घटक असल्याने त्यांची सदरहू व्यवहारास संमती/मान्यता असून, सदरहू मिळकती संदर्भात लिहून घेणार यांना विकासक या नात्याने भविष्यात कोणतीही अडचण उपस्थित होऊ नये तसेच लिहून देणार हे सरकार दप्तरी ७/१२ सदरी लिहुन देणार यांच्या नावाची नोंद असली तरी, सदरहू जमीनींच्या मिळकती लिहून घेणार/विकासक यांना सर्वऋणबोझेमुक्त व बोजेविरहीत विकसन योग्य प्राप्त व्हाव्यात म्हणून लिहून देणार यांच्या कुटुंबीयांतील अन्य सदस्य हे मान्यता देणार या नात्याने सदरहू भूविकास करारात शामील झालेले आहेत.

सदरहु मिळकतींची निगा राखणे व सदरहू मिळकती अतिक्रमणापासून संरक्षीत ठेवणे लिहुन देणार यांना शक्य नसल्यामुळे वरील सर्व घटनाक्रम व वस्तुस्थिती लक्षात घेता सदरहू मिळकती विकसीत केल्यास अथवा विकसीत हक्काने भावी विकासकास तबदील केल्यास त्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या वास्तुस्वरूपी मोबदल्या अंतर्गत कुटुंबातील सदस्यांना सदरहू वास्तुस्वरूपी मोबदल्याचा वापर करता येईल. तसेच लिहून देणार यांना प्राप्त होणाऱ्या आर्थिक मोबदल्यातून कुटूंबाची योग्य ती सोय करता येईल या व इतर सर्व अनुषंगीक कारणांमुळे लिहून देणार यांनी सदरहू

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR